## Arts & Commerce College Warwat Bakal
## Tq. Sangrampur Dist. Buldana

### Research Papers 2019-2020

| Sr. No | Title of Paper | Name of Author | Department | Journal | Year | Impact Factor |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महात्मा गांधींचा पर्यावरणात्मक दृष्टिकोन | Dr. M. S. Hingankar | Zoology | Peer Reviewed international Refereed Research Journal | 2020 | |

UGC Sponsored

ISSN 2319-9318

# Vidyawarta

Peer Reviewed International Refereed Research Journal

Special Issue February 2020

## ONE DAY INTERDISCIPLINARY INTERNATIONAL CONFERENCE on

# EXPLORATION OF MAHATMA @ 150

on

29th February 2020

150

YEARS OF CELEBRATING THE MAHATMA

Edited By

Gandhi Study Centre

New Arts, Commerce & Science College,

Wardha, Maharashtra (India) - 442 001

ISSN No. -2319 9318

# Conference Proceedings Publication

**Dr. Prashant R. Kadwe**
**Director, Gandhi Study Centre**
**New Arts Comm And Sci College Wardha(MS)**

## -: Advisory Board:-

Dr. R. G. Bhoyar
Dr.Ashish B. Sasankar
Dr.Shashi Poonam(HP)
Prof. Tatiana Oranskaia (Russia)
Dr. Oscar Pujol (Spain)
Dr. Harishkumar Saddi (Punjab)
Dr. Chaitali Choudhari
Dr Karabi Mitra(Calcutta)
Dr. Abhijit Verulkar
Dr Ravi Kumar (Delhi)
Prof. R. P. Singh (Jodhpur)
Dr. Balraj Singh Brar (Patiala)
Dr. Aparajit Chattopadhyay (Kolkata)
Dr. Sandhya Singh (Singapore)
Malashikha (Doon Uni, Uttarakhand)
Gaurav Kumar (JNU, New Delhi)

## -: Board of Editors -:

**Dr Ashish B. Sasankar**
Principal
New Arts Comm & Sci college
Wardha-442001 (M.S.)

**Dr Prashant R. Kadwe**
Director Gandhi Study Centre
New Arts Comm & Sci College
Wardha-442001 (M.S.)

-: Date of Publication: -
**29th February 2020**

Note: - The board of editors may or may not be agree with the thoughts mentioned by individual writer in the book. The concerning writer is responsible in case of authenticity of his/her paper.

IMPACT 7.041 FACTOR

| | | |
|---|---|---|
| 44 | महात्मा गांधीजींचे अहिंसेसंबंधीचे विचार.<br>डॉ. अभिजीत वि. वेरूळकर, कला व विज्ञान महाविद्यालय, पुलगांव | 131 |
| 44 | महात्मा गांधी आणि लोकशाहीचे सिध्दांत.<br>गौरवकुमार गो. ठाकरे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | 132 |
| 45 | गांधीजी आणि भाषा व शिक्षणपध्दती.<br>घनश्याम अ. वाघमारे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | 136 |
| 46 | महात्मा गांधीचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान.<br>हर्षल ध. लुंगे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | 141 |
| 47 | अध्यात्म आणि गांधी<br>प्रा.डॉ.जयश्री स. सातोकर, प्रगती महिला कला महाविद्यालय, भंडारा. | 144 |
| 48 | महात्मा गांधीच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता.<br>डॉ. कैलाश वि. बिसाद्रे, अनिकेत समाजकार्य महाविद्यालय, वर्धा | 148 |
| 49 | स्वदेशी चळवळ<br>कलावती भि. चनकापुरे, न्यु. आटर्स, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज वर्धा | 153 |
| 50 | महात्मा गांधीचे अहिंसा तत्वाचे भारतीय विकासातील योगदान.<br>प्रा. कल्पना एम. बडिवार, अनिकेत समाजकार्य महाविद्यालय, वर्धा | 155 |
| 51 | सत्याग्रहाची लोकशाहीतील भूमिका.<br>प्रगती महिला महाविद्यालय, भंडारा | 157 |
| 52 | गांधीचे विचार : समपर्कता आणि वेगळेपण.<br>कु. कविता मेशकर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | 159 |
| 53 | महात्मा गांधीचा पर्यावरणात्मक दृष्टीकोन.<br>डॉ. माधुरी सु. हिंगणकर, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल, जि.बुलढाणा | 163 |
| 54 | गांधीवाद, एक अध्ययन.<br>महेंद्र भि. भगत, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | 165 |
| 55 | महात्मा गांधी यांचे विधायक कार्यक्रम.<br>प्रा. मनोहर वागतकर, श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, बु. अकोला. | 167 |
| 56 | गांधीजींचे आरोग्य विषयक विचार.<br>प्रा.डॉ. मनोज श्री. पवार, मातोश्री अंजनाबाई समाजकार्य महाविद्यालय, नरखेड | 172 |
| 57 | महात्मा गांधीजींचे राष्ट्र उभारणीतील योगदान : एक ऐतिहासिक अध्ययन<br>मोहन ओं. बेलोकार, नारायण राणा महाविद्यालय, बडनेरा | 173 |
| 58 | गांधी – खादी.<br>डॉ. नारायण मो. वघाळे, मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय, नरखेड | 175 |
| 59 | समाजिक चळवळ आणि सुधारणा.<br>प्रा.नवनाथ बं. बडे, श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी.अकोला | 178 |
| 60 | खेड्याकडे चला : महात्मा गांधी.<br>डॉ. निखिल मनोहरराव देशमुख, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर | 183 |
| 61 | नाट्य साहित्यातील गांधी दर्शन.<br>डॉ. सतीश पावडे, महात्मा गांधी अंतराष्ट्रीय हिन्दी विद्यापीठ, वर्धा | 186 |
| 62 | महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार व महत्व.<br>प्रा. पुनम रा. भुरे, जोतीराव फुले समाजकार्य महाविद्यालय, उमरेड, जि. नागपूर | 190 |
| 63 | भुदान चळवळीचे सामाजिक आर्थिक परिणाम.<br>प्रफुल ई. ढोके, मातोश्री अंजनाबाई मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय, नरखेड | 194 |
| 64 | महात्मा गांधी यांच्या धार्मिक विचारांची प्रासंगिकता.<br>प्रा. डॉ. प्रकाश आर. शेन्डे, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर | 197 |
| 65 | महात्मा गांधीजींचे आदर्श राज्य.<br>प्रा. डॉ. प्रमोद आचेगावे, न्यू. आर्टस् ॲण्ड सायंस कॉलेज, वर्धा | 199 |
| 66 | महात्मा गांधींचे स्वदेशी आंदोलन.<br>प्रा. प्रमोद एच. पौनिकर, जोतीराव फुले समाजकार्य महाविद्यालय, उमरेड, जि. नागपुर | 200 |
| 67 | गांधीजी आणि नैतिकता.<br>प्रा. प्रमोद बा. तडस, न्यू. आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, वर्धा | 204 |

# महात्मा गांधींचा पर्यावरणात्मक दृष्टिकोन

डॉ. माधुरी सुधाकर हिंगणकर , सहा. प्राध्यापक कला अणि वाणिज्य महाविद्यालय वरवट बकाल जि. बुलढाणा

**प्रस्तावना :–**

महात्मा गांधीनी 1909 मध्ये "हिंद स्वराज" पुस्तिका लिहीली. या पुस्तीकेमध्ये भारताला आलेल्या गुलामीच्या प्रश्नांची चर्चा केली आहे. मोठी यंत्रे संसाधनाचा प्रचंड वापर आणि त्यामधून होणारा पर्यावरणाचा –हास पृथ्वीची धूप यामुळे उद्‌भवलेल्या प्रश्नांची चर्चा केली आहे. पर्यावरणची हि हाणी वेळीच लक्षात घेतली नाही तर येणारे भविष्य उध्वस्त होईल याची आठवण करून देतांना ते दिसतात. हिंद स्वराज्यामध्ये आलेले विचार अथवा त्यामध्ये केलेली चर्चा गांधीनी 'माझ्या स्वप्नातील भारत' यामध्ये केली आहे. गांधी लिहितात वर्तमानातील अराजकता त्यात निर्माण होणारी अंधाधुंद आणि उद्‌भवलेले शोषण यांना मोठी यंत्रे जबाबदार आहेत. विज्ञानाच्या शोधातुन वास्तवत: मानवी कल्याण आणि त्याचे शाश्वत जीवन समृध्दी व्हायला हवे होते. परंतु नेमके उलट यामुळे घडलेले आहेत. खरे तर गांधीचा यंत्राना विरोध नाही तर यंत्राच्या माध्यमातून नको असलेल्या हव्यासाला गोंजारले जात असल्याने त्याला त्यांचा विरोध आहे. या संदर्भात ते म्हणतात. " मेरा विरोध यंत्रो के सबंधी मे फैले हुये दिवाणेपणसे है । यंत्रो से नही. परिश्रम के बचाव करने वाले यंत्रो के सबंध मे लोगो का जो दिवाणापण है । उसीसे मेरा विरोध है । परिश्रम के बचत से आज हजारो लोगोंको भुखे मरणा पड रहा है ।"

गांधीनी पर्यावरणाला सर्वाधिक मोठा धोका मानवी बौध्दिक क्षमतेतून उदयास आलेले प्रचंड क्षमता राखणा–या यंत्रामुळे असल्याचे मांडले आहेत. या यंत्र व्यवस्थेतूनच भांडवलशाही व्यवस्था उभ्या झाल्या आणि त्यामुळे पृथ्वीवरील जीवनमान त्याची सुरक्षीतता मानवी पर्यावरण जीवनसृष्टीतील नाते सबंध यांना लक्षात न घेता बक्कळ नफा प्राप्त करण्याच्या हव्यासातून लयलूट सुरू आहे. परिणामी प्रथ्वीवरील मोठया प्रमाणावरील जनजीवन बाधीत झालेली दिसते. शुध्द हवा, अन्नामधील शुध्दता लोप पावत चालेल असून कॉर्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढीस लागले आहे. तंत्रज्ञानातील नव्या अविष्कारामुळे जीवंत माणसे श्रमयुक्त झालीत तर कुठलेही मुल्य न देता प्रचंड स्वरूपातील वस्तुंची निर्मिती करणा–या कृत्रिम मानवामुळे दुहेरी शोषणाला वाव मिळतो आहे. गांधीचा श्रम, जीवनाला नाके मुरडणा–यांचा आता लक्षात येवू लागले की मोठ्या प्रमाणावरील बेरोजगारीला यंत्रे कारणीभूत ठरत आहेत लोकसंख्येचा पृथ्वीवरील भार वाढत असून वैज्ञानिक दृष्ट्या तिची भार पेलण्याची क्षमता केवळ दोनशे कोटी आहे असे असतांना 750 कोटीवर पृथ्वीवरील लोकसंख्या पोहचल्याने सिध्दांताला धक्का पोहचलेला दिसून येतो. यामुळे विषमतेची दरी मोठ्या प्रमाणात वाढु लागली आहे. एक प्रकारे विषमता निर्माण करणारी आहे भाडवली व्यवस्था आणि मागास व्यसस्था या दोन्ही ठिकाणामध्ये पर्यावरणाच्या –हासा सोबतच मानवी हक्कांचा बळी जाताना दिसतो " मानवी हक्क उल्लंघणारी अधिक स्थिती दोन प्रकारच्या राष्ट्रीय राजकारणात दिसून येतात. एक म्हणजे ज्या देशामध्ये प्रंचड गरिबी आहे त्या देशात मानवी हक्काचे उल्लघण अधिक होतात तर विकसित देशामध्ये समाज आणि राष्ट्रीकरीता व्यक्तिची कर्तव्य अधिक मानल्या गेली आहेत. त्यामुळे तिथेही मानवी हक्क सहजपणे मिळत नाही "[2]

जगभरातील एकूण स्थिती लक्षात घेता गांधीनी प्रतिपादीत केलेला विचार लक्षात घ्यावा लागतो.


**गांधीचा पर्यावरण विषयक दृष्टिकोन :** स्वातंत्र्य आंदोलनाच्या कालखंडात गांधी राजकीय प्रश्नापर्यंत मर्यादीत न राहता समाज जीवनाच्या इतर प्रश्नांचाही सांगोपांग आणि सुक्ष्म विचार करतांना दिसतात. गांधीचे वैशिष्टये म्हणजे ते केवळ राजकीय प्रश्नाच भोवती किंवा स्वातंत्र म्हणजे ब्रिटीशांची सत्ता जावून आपली सत्ता निर्माण व्हावी या विचारापर्यंत मर्यादीत न राहता त्यांनी राजकीय स्वातंत्र्याच्या संकल्पनेत अस्पृश्ता निवारण, स्वदेशी अर्थव्यस्था म्हणजे सर्वोदय लिंग भेद–भावाला नकार ज्या रूढी आणि परंपरातून शोषण होते त्याला नकार आणि महत्वाचे म्हणजे स्वराज्याचा अबाधित आंनद पुढचरूा पिढ्यांना मिळाव्यात याकरिता आरोग्य स्वच्छता आणि पर्यावरण यांचा समावेश शाश्वत विकास म्हणून केलेला हो त्याची स्वराज्याची संकल्पना कशी विस्तृत आणि चिरंतन स्वरूपाची दिसते. गांधीने समस्येला पाहून/ मांडणी मानवी जिवनाचा संहार घडून आणणा–या समस्या याने पृथ्वी वेढलया गेली आहे. रासायनिक कारखण्यातील सोडली जाणारी जहरी वायू त्यामुळे वातावरण विषक्त बनली असून पृथ्वीचे रक्षण करणा–या ओझोन वायूच्या स्तरावर छिद्र पडले आहेत. हि हानी इतकी मोठी आहे कि हि न भरून येणारी आणि प्रतिबंध घालण्याच्या पलिकडे गेली आहे. पृथ्वीवरील जीवन यांचे रक्षण करणे हे सगळयात महत्वाचे काम आहे. आणि त्याकरीता रचनात्मक कार्यकमातील सात पावले अथवा तिची सप्तपदी अंगीकारणे हाच त्यावरील उत्तम पर्याय ठरेल.

- कमीत कमी वस्तूंचाउपयोग होणारे जीवन आपण विकसित केले पाहिजे.
- पाण्याचा संग्रह करणे ते पृथ्वीत साठवणे आणि वापरलेला पाण्याला पूर्नरवाराच्या दृष्टीने प्रयत्न करणे.
- वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि वृक्षांच्या प्रती प्रेम आणि जोपासण्याची भावना निर्माण करणे.

- सृष्टीतील पर्यावरण पूरक जीवजंतूची हिंसा होणार नाही याची काळजी घेणे किंवा जिव नष्ट करणा–या वस्तूच्या उपयोग न करणे.
- पाणी विषाक्त बनविणा–या रसायणाचा, रासायनिक खताचा वापर न करणे.
- हवा विषाक्त बनविणा–या बाबी न वापरणे त्यासाठी लोकमत जागृत करणे महत्वाचे म्हणजे ग्रेड उर्जा जागृती, प्रदुषण होणार नाही यांचा वापर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.
- पर्यावरणाला सुरक्षित राखणा–या जीवजंतूच्या विकास करणे.[3]

गांधीनी पर्यावरणाच्या संदर्भात वेगवेगळया वेळांमध्ये आणि आपल्या लिखाणातून जी मांडणी केली त्या विचारातून हि सप्तपदी स्पष्ट होताना दिसत असल्याचे नवल भाई शाहा यांनी मांडलेले आहेत. गांधीच्या रचनात्मक कामाचा आणि तत्वज्ञानाचा यांच्याशी सरळ संबंध असल्याचे ते नमुद करतात. नवलभाईनी विखूरलेल्या विचारांना या सात पर्यायाच्या माध्यमातून सद्य काळातील महत्वाचा भाग म्हणून त्याची प्रस्तुती केली आहे. गांधीचा पर्यावरण विषयक दृष्टिकोन तया दृष्टीने महत्वाचा आहे.

**समालोचन :** अलिकडच्या कालखंडात राष्ट्रीय आणि आतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरणाचा विचार गंभीरपणे होवू लागला आहे. अनेक परिषदांचा आयोजनात चर्चा यामधून सोडवणूक करण्याचे प्रयत्न राजकिय आणि सामाजिक पातळीवर सुरु आहेत. या प्रयत्नामध्ये खोडागणीचे काम मात्र विकसीत राष्ट्रीय करतांना दिसतात. कार्बन वायू उत्सर्जनाचा प्रश्नांवर अमेरिकेनी घेतलेली आडमूडी भूमिका घेउन स्वतःच्या हिताकरीता मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जनाला वाव देतांना दिसतात. परिणामी राजकीय पातळीवर सुटणारा प्रश्न अलिकडे मात्र तो एका चक्रात अडकलेला दिसतो. भांडवलवादी कंपनीत नफेखोर होणे मानवी दृष्टीकोनातून विचार करीत नाही. भारतात सुध्दा डोळयात भरणा–या विकासामध्ये जंगल वाचविणा–या समुदायाचे विषण्ण करणारे विस्थापण पाहता आले नाही. अनेक शतके जोपासणारी जंगजाची समृध्दता तिच्या आत दडलेल्या संसाधनचा उपसा करण्यासाठी त्यांची जगलतोड करतांना संपविल्या जातात. अश्या परिस्थितीत पर्यावरणाचे प्रश्न पुन्हा नव्याने समजून घ्यावा लागतो. गांधी शतकोत्तरी सुवर्ण माहोत्सवाच्या काळात केवळ चारित्र पारायण अथवा व्यक्ति पूजकता आणि त्याबाबतचा बाहय अतर्गत आवेश दिसतो आहे. पण या दृष्टिने प्रयत्न करणे आणि या बाबतीत कमी ठरते आहे " पृथ्वी समस्त मानवाच्या मुलभून गरजा भागवू शकते परंतू मानवाच्या हव्यास भागविण्याची क्षमता तात नाही " 131 कोटी लोकसंख्येत 1 टक्के भारतीयांकडे 58 टक्के संपत्तीची मालकी आहे तर 750 कोटी पैकी जगातल्या माध्यमात 1300 घराण्याकडे 73 टक्के लोकांची केंद्रीकरण झालेले संपत्तीमध्ये हे विषम वाटप आणि संपत्तीच्या वाटप यासाठी पर्यावरणाचे होणारे शोषण लक्षात घेतले तर पृथ्वीचे आयुष्य वेगान संपूष्टात येत असल्याचे म्हणावे लागते धर्म शासनात कल्पीलेल्या युगापेक्षाही वेगाने पृथ्वीचया अस्तित्वाचे चिन्ह धुमिळ होण्याची शक्यता वाढली आहे. गांधी आणि त्यांचा परिवार यांनी समाज व्यवस्थेला जागृत करतांना दिलेला विचार महत्वाचा ठरतो. गांधीचे शिष्य निरावहन या बाबतीत म्हणतात " भूमाता ज्या जीव सृष्टीचे व वनसृष्टीचे सर्जन करते. तिच्यापासून लोक लांब गेले आहेत. निसर्गाचे लूटमार हात आहे, नासधूस होत आहे. विज्ञान व तत्रज्ञानाच्या युगातून काही काळ माणसाला मोठी संपत्ती मिळेल असे वाटत असेल पण शेवटी ते नष्ट होणार आहे. नैसर्गिक समतुल्याचा विचार करुन नैसर्गिक नियमांचा चौकटीत विकास साधायला हवे तरच शारीरिक आरोग्य व पर्यावरण टिकवता येईल. "



New Arts, Commerce & Science College,
Wardha, Maharashtra (India) - 442 001

IMPACT FACTOR 7.041 sjif

Peer-reviewed

Harshwardhan Publication Pvt. Ltd
At. Po. limbaganesh, Tg. Dist. Beed - 431 126
(Maharashtra)

₹ 700/-

ISSN 2319-9318